# ।०। शिवछत्रपती ।०।

## इयत्ता चौथी

(परिसर अभ्यास – भाग २)



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक
प्राशिसं/२०१४–१५/२१०२/मंजुरी/ड – ५०५/७५५ दिनांक ४.२.२०१४

# शिवछत्रपती

## (परिसर अभ्यास – भाग २)

## इयत्ता चौथी

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

CJPU62

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०१४**
**सुधारित आवृत्ती : सप्टेंबर २०१६**
**पुनर्मुद्रण : जुलै २०२०**

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती :**
डॉ. आ. ह. साळुंखे, अध्यक्ष
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
डॉ. नीरज साळुंखे, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**संयोजक :**
श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र

**चित्रे व सजावट :**
प्रा. दिलीप कदम, श्री. देवदत्त बलकवडे,
श्री. संजय शेलार

**छायाचित्रे :**
श्री. प्रवीण भोसले

**नकाशाकार :**
श्री. रविकिरण जाधव
डॉ. नीरज साळुंखे

**निर्मिती :**
श्री. सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब, निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे, साहाय्यक निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :**
विजय आर्ट प्रिंटर्स, पुणे.

**कागद :** ७० जी.एस.एम., क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :** N/PB/2021-22/Qty.- 40,000

**मुद्रक :** M/s. Prabhat Printing Worka, Pune

**प्रकाशक :**
श्री. विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

## प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२' अन्वये शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २०१३-२०१४ या शालेय वर्षापासून क्रमश: सुरू झाली आहे. अभ्यासक्रमात इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत सामान्य विज्ञान, नागरिकशास्त्र व भूगोल हे विषय एकत्रितरीत्या परिसर अभ्यास भाग-१ मध्ये समाविष्ट राहतील. इतिहास हा विषय परिसर अभ्यास भाग-२ मध्ये स्वतंत्र राहील, असे नमूद केले आहे.

शासनमान्य अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तक मंडळाने इयत्ता चौथीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'विहित क्षमता' प्राप्त कराव्या, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी, असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास सुलभ आणि परिणामकारक शैलीत गोष्टीरूपाने विद्यार्थ्यांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाजी महाराजांचे चरित्र आणि कामगिरी ही घटना संपूर्ण महाराष्ट्रासाठी व देशासाठी एक प्रेरणास्रोत मानली जाते. पाठ्यपुस्तकात शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामधील विविध स्फूर्तिदायी घटना दिलेल्या आहेत. या पाठ्यपुस्तकाच्या संदर्भात विविध सामाजिक संघटना, संस्था यांच्याकडून आणि व्यक्तिगत पातळीवर आलेल्या तक्रारींची व सूचनांची समितीने योग्य पद्धतीने छाननी करून प्रस्तुत पुस्तकाचे पुनर्लेखन केले आहे. तसेच आवश्यक तेथे काही अनुरूप अशा दुरुस्त्याही करण्यात आलेल्या आहेत.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्रातील काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. इतिहास विषय समिती, चित्रकार, छायाचित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक : १९.०२.२०१४**

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## परिसर अभ्यास भाग-२ इयत्ता चौथी

| अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यांनी अध्ययन अनुभवाच्या संधी गटात/जोडीजोडीने वैयक्तिक देऊन पुढील गोष्टींसाठी प्रोत्साहित करावे.**<br>• कुटुंबातील ज्येष्ठांशी / सदस्यांशी चर्चा करणे व प्रश्न विचारणे जसे की कुटुंबातील काही लोक एकत्र राहतात. चर्चा करतात व काही दूर राहतात, हे समजून घेणे. दूर राहणारे नातेवाईक, स्नेही यांच्याशी संवाद साधून त्यांची घरे, दळणवळणाची साधने व त्यांच्या ठिकाणचे लोकजीवन याविषयी जाणून घेणे.<br>• भीती न बाळगता किंवा न संकोचता अनुभवावर प्रश्न तयार करणे व मनन करणे.<br>• आईवडिल/पालक/आजी-आजोबा, शेजारील वडीलधारे यांच्याशी चर्चा करणे आणि त्यांच्या आयुष्यातील, भूतकाळातील व सध्याच्या दैनंदिन वापराच्या वस्तू उदा. कपडे, भांडी, कामाचे स्वरूप, खेळ यांची तुलना करणे,विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समावेशन.<br>• शिवचरित्रातील घटनांवर आधारित भूमिकापालन करणे.<br>• गटचर्चेच्या माध्यमातून धैर्य, परिश्रम, प्रसंगावधान यांच्या मदतीने संकटावर कशी मात करता येते, याचा शोध घेणे.<br>• शिवचरित्रातील उदाहरणांवरून पर्यावरण रक्षण, जलसाक्षरता, समता, न्याय इत्यादीबाबत जाणीवा विकसित करणे.<br>• घरी/शाळेत/समाजात आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक/राष्ट्रीय/ पर्यावरणाच्या, उत्सव/विविध प्रसंगांमध्ये भाग घेणे. उदा. सकाळच्या किंवा विशेष सभा/प्रदर्शन/दिवाळी/ओणम/वसुंधरा दिन/ ईद इत्यादी तसेच समारंभांमध्ये, नृत्य, नाट्य, अभिनय, सर्जनशील लेखन व कृती करणे. (उदा. पणत्या/रांगोळी/पतंग बनवणे, इमारतींच्या प्रतिकृती, नद्यांवरील पुलांच्या प्रतिकृती बनवणे इत्यादी) कथा, कविता, घोषवाक्ये, घटनांच्या अहवालांचे कथन, सर्जनशील लेखन किंवा एखाद्या सर्जनशील कृतीतून सादर करणे.<br>• पाठ्यपुस्तकाच्या बरोबर इतर संसाधने वाचणे / शोधणे जसे, वृत्तपत्रांमधील कात्रणे, श्राव्य साधने/ गोष्टी/ कविता/चित्रे/ चित्रफिती/स्पर्शाने जाणवणारे उठावदार साहित्य, आंतरजाल/ ग्रंथालय तत्सम अन्य कोणतेही संसाधन.<br>• पारंपरिक व आधुनिक पोशाखातील फरक समजणे.<br>• राज्यातील भाषा, बोलीभाषा, सण व उत्सव यांची माहिती जमा करणे. | **अध्ययनार्थी -**<br>04.95B.01 विस्तारित कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध ओळखतात.<br>04.95B.02 कुटुंब/ शाळा / शेजार या ठिकाणी निरीक्षण केलेल्या / अनुभवलेल्या समस्यांवर स्वतःचे मत मांडतात, (उदा. साचेबद्धपणा/ भेदभाव/ बालहक्क)<br>04.95B.03 गटात एकत्र काम करत असताना एकमेकांविषयी आस्था, समानानुभूती व नेतृत्वगुण या बाबींमध्ये पुढाकार घेतात व सक्रिय सहभाग घेतात. उदा. वर्गातील (Indoor)/ वर्गाबाहेरील (Outdoor)/स्थानिक/समकालीन उपक्रम आणि खेळ तसेच वनस्पतींची काळजी घेणे, पशु-पक्ष्यांना खायला देणे, भोवतालच्या वस्तू/वडीलधारे / दिव्यांग यांच्यासाठी प्रकल्प करणे / भूमिका करतात.<br>04.95B.04 छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वामधील विविध स्फूर्तीदायी घटना सांगतात.<br>04.95B.05 चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटावर मात करता येते. हे शिवचरित्रातून आत्मसात करतात.<br>04.95B.06 भौगोलिक व सांस्कृतिक कारणामुळे वस्त्रांमधील विविधता सांगतात. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र | १ |
| २. | संतांची कामगिरी | ३ |
| ३. | मराठा सरदार-भोसल्यांचे कर्तबगार घराणे | ८ |
| ४. | शिवरायांचे बालपण | १२ |
| ५. | शिवरायांचे शिक्षण | १७ |
| ६. | स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा | २१ |
| ७. | स्वराज्याचे तोरण बांधले | २५ |
| ८. | स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त | २९ |
| ९. | प्रतापगडावरील पराक्रम | ३२ |
| १०. | शर्थीने खिंड लढवली | ३७ |
| ११. | शायिस्ताखानाची फजिती | ४२ |
| १२. | पुरंदरचा वेढा व तह | ४५ |
| १३. | बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या | ५० |
| १४. | गड आला, पण सिंह गेला | ५३ |
| १५. | एक अपूर्व सोहळा | ५७ |
| १६. | दक्षिणेतील मोहीम | ६० |
| १७. | गडकोटांचे आणि आरमाराचे व्यवस्थापन | ६५ |
| १८. | लोककल्याणकारी स्वराज्याचे व्यवस्थापन | ७० |

‘शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हते तर ते साऱ्या राष्ट्राचे होते. त्यांनी थोर तत्त्ववेत्त्यांच्या शिकवणुकीतून स्फूर्ती घेतली होती. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेतून केवळ स्वतःसाठी राज्य स्थापन करण्याची त्यांना इच्छा नव्हती. तत्कालीन राज्यपद्धतींच्या गुणावगुणांचा त्यांनी अभ्यास केला आणि त्यातून आपले विशिष्ट धोरण व राज्यव्यवस्था यांची आखणी केली. महाराज स्वतः धर्मनिष्ठ हिंदू होते, तसेच इतर धर्मांविषयीची त्यांची भावना सहिष्णुतेची होती. इतर धर्मीयांच्या पूज्य स्थानांसाठी त्यांनी इनामे दिली. शिवाजी महाराज एक थोर सेनानी होते. स्वातंत्र्यरक्षणासाठी आरमाराची आवश्यकता आणि महत्त्व त्यांना पटले होते. इंग्रज व डच यांच्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी त्यांनी प्रबळ आरमार उभारले. प्रतापगड किल्ल्याच्या बांधणीत त्यांची युद्धशास्त्रातील निपुणता दिसून येते. शिवाजी महाराजांचे आपल्या देशावर फार प्रेम होते आणि मानवी सद्गुणांचे तर ते साक्षात प्रतीक होते.’

**– पंडित जवाहरलाल नेहरू**



**मीर महंमद या शिवकालीन चित्रकाराने काढलेले शिवाजी महाराजांचे चित्र**

(मूळ चित्र पॅरीस येथील संग्रहालयात आहे.)